**कृपया प्रथमत: आपण खालील  सूचना वाचा**

- तंत्रज्ञानामध्ये आपल्याही गावाचा उल्लेख असावा असे आपणास वाटते. याबद्दल आपले मनापासून आभार
- आपले गाव संपुर्ण जग पाहणार असल्याकारणाने  कृपया माहीती शक्यतो थोडक्यात आणि रोचक लिहावी.
- आपल्या गावाची माहीती आपल्या मायबोलीत सादर होणार असल्याकारणाने  सर्वांना ती सहज वाचता येईल.
- प्रत्येक रकाण्याची माहीती मिळेलच असे नाही तसे झाल्यास ती जागा रिकामी सोडावी.
- व्यक्तींचे फोटो शक्यतो पासपोर्ट साइज स्वरूपात दयावे. किंवा  फोटोग्राफरला सांगुन आपले संबंधीत फोटो काढून घ्यावे.
- गावाच्या विकासकामांची, गावातील वास्तू व मंदिरे, सार्वजनिक वास्तू यांची जास्तीत जास्त ६० फोटो स्वीकारली जातील.
- कृपा करून तुम्ही ६०  फोटो देतानाच निवडुन मिळाले तर बरे होईल.
- **गावाच्या माहिती ही  संबधित  जाणकारांच्या  उपस्थितीने  एका  दिवसातच  गोळा होऊ शकते. याच्या पाठिमागील कारण म्हणजे गावाला सारखी-सारखी  भेट देणे ही वेळखाऊ अणि खर्चिक बाब आहे. त्यामुळे कृपया सहकार्य व्हावे.**
- एक मात्र आहे आपण या संग्रहीत माहितीची नंतर  "गावाची पुस्तिका " बनवु शकतो..
- आपण गावाचा  **सॅटेलाईट नकाशा** या वेबसाईटच्या सोबत जोडणार आहोत जो जसा आहे तसा पाहता येणार आहे.
- गावाला **चालु घडामोडी**  साठी खास फेसबुक कंपनीशी टाय-अप करून एक फेसबुक पेज दिले आहे.यात तुम्ही  हवी तेवढी माहिती व फोटो टाकु शकता. यासाठी गावातच राहणारी  आणि संगणकाचे ज्ञान असणारी  एखादी व्यक्ती आपण शोधा आम्ही त्यांना  प्रशिक्षण देऊ जेणेकरून  ते  आपल्या गावातील चालु घडामोडीची नोंद वेबसाईटवर करेल.
- या वेबसाईट मध्ये आपण गावातील व्यावसायिकांच्या जाहिरातीची सोय केली आहे. शिवाय गावातून आपण वेबसाईट साठी मदत म्हणून वेबसाईटचे स्पॉन्सर हे विभाग दिले आहेत. त्यातून जमा होणारी समिधा ही ग्रामपंचायतीकडेच राहणार आहे. त्यासाठीचे सर्व हक्क हे ग्रामपंचायतीकडेच राहणार आहे.
- संबधीत माहितीबाबत शंका असल्यास फोन करा: वैभव पोखरकर ( 9860410496).
- प्रातिनिधिक स्वरूपाच्या वेबसाईट पाहण्यासाठी गुगल वर www.pimpalgaonkhadki.com हे संपूर्ण  नाव टाकल्यावर दिसेल.
- आपल्या संकेतस्थळाचा  पत्ता आहे. www.swapnweb.co.in

**मुख्य पान** :- यात गावाची प्राथमिक माहिती समाविष्ट केली आहे.

१) गावाचे वर्णन (थोडक्यात):-

२) गावाच्या चतु:सीमा :-

३) नद्या नाले तलाव :-

४) गावात येण्या-जाण्याचे मार्ग:-

**गावाविषयी :-** यात गावतील सर्वसाधारण माहिती समाविष्ट आहे.

1. ग्रामपंचायतीचे नाव/ तालुका/ जिल्हा/ स्थापना:
2. गावची लोकसंख्याः स्त्री/ पुरूष/ एकुण :
3. एकुण भौगोलिक क्षेत्रः
4. लागवडीलायक क्षेत्रः
5. पिकाखालील क्षेत्रः
6. वनक्षेत्रः
7. गायरान क्षेत्रः
8. प्रमुख पिकेः
9. प्रमुख व्यावसायः
10. एकुण विहीरीः
11. एकुण मळे /वाडीः
12. बचत गटः
13. वैयक्तीक शौचालयेः
14. सार्वजनिक शौचालयेः
15. पाण्याची टाकी (क्षमता लिटर मध्येः)
16. भजन मंडळेः
17. शैक्षणिक :
18. आरोग्य केंद्रः
19. दुध डेअरीः
20. स्वस्त धान्याचे दुकानः
21. बॅंक /पतसंस्थाः
22. वाचनालयः
23. व्यायामशाळाः
24. मंदिरेः
25. स्मशानभुमीः
26. पोलिस स्टेशन :
27. टपाल सुविधा :
28. बायोगॅस :

तुम्हाला जर एखादा मुद्दा सुचला तर कृपया त्याची नोंद करा .

**ग्रामपंचायतविषयी :-**

| अ. न. | ग्रामपंचायत संबंधीचे कागदपत्रे | फाईल डाऊनलोड करा. |
|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत अंदाजपत्रक | येथे जर आपल्याकडे कॉम्पुटर मध्ये टाईप स्वरुपात माहिती असेल तर ती या ठिकाणी पी.डी.एफ स्वरुपात दिली जाईल जेणेकरून थेट इंटरनेटवरून आपले काम पाहता येईल. हि तुम्हाला डायनामिक पद्धतीने दिली जाईल ज्यात तुम्ही गावाचे महत्वाचे कागदपत्रे डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध कारून देऊ शकता. |
| २. | कर मागणी / वसुली | |
| ३. | जमाखर्च | |
| ४. | वैयक्तिक लाभाच्या योजना | |
| ५. | इंदिरा आवास योजना | |
| ६. | महिला बाल कल्याण योजना | |
| ७. | विशेष घटक योजना | |
| ८. | विकासकामांची इस्तंभूत माहिती | |
| | | |
| | | |
| | | |

वरील योजना डेमो म्हणून दिल्या आहेत आपणास हव्या त्या संबधीची माहिती आपण देऊ शकता.

| ग्रामपंचायत अंतर्गत व्यक्तींची नावे | | | |
|---|---|---|---|
| अ. न. | नाव | पद | मोबाईल नं. |
| १. | | ग्रामसेवक | |
| २. | | सरपंच | |
| ३. | | उपसरपंच | |
| ४. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| ५. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| ६. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| ७. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| ८. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| ९. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| १०. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| ११. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| १२. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| १३. | | ग्रामपंचायत सदस्य | |
| १४. | | पोलीस पाटील | |
| १५. | | तलाठी भाऊसाहेब | |
| १६. | | ग्रामपंचायत लेखनिक | |
| १७. | | पोस्टमन | |
| १८. | | शिपाई | |
| १९. | | | |

हि पण यादी डायनामिक असेल. कारण दरवेळेस सरपंच किंवा सदस्य बदलल्या नंतर माहिती अपडेट करणे अवघड होऊन बसेल.

**गावात झालेली विकासकामे:-** यात आपण आपल्या गावात झालेली विकासकामे उदाहरणादाखल पिंपळगाव तर्फे महाळुंगे याची झालेल्या विकासकामाचे स्वरूप खालीलप्रमाणे. (डायनामिक स्वरूपात )

| पिंपळगाव तर्फे महाळुंगे मध्ये झालेली विकासकामे | |
|---|---|
| अ. न. | विकासकामाचे नाव |
| १. | ग्रामसचिवालय बांधकाम यशवंत ग्रामसमृद्धी योजना व जिल्हा ग्रामनिधी योजने अंतर्गत |
| २. | रस्ता कॉंक्रिटीकरण इतर ग्रामविकास कार्यक्रमांतर्गत (पाच लक्ष) |
| ३. | पाणी पुरवठा योजना महाजल योजनेअंतर्गत (५० हजार लिटर) |
| ४. | |

**गावाला मिळालेले पुरस्कार :-** आता पुरस्काराबाबत कश्या पद्धतीने माहिती द्यासाठी खलील उदाहरण पहा. आता फोटो पहा म्हटल्यावर फोटो सुद्धा द्या. आणि फोटोच्या पाठीमागे कोणत्या पुस्काराचा आहे ते पण लिहा.(डायनामिक स्वरूपात)

| अ. न. | पुरस्काराचे नाव | फोटो पहा . |
|---|---|---|
| १. | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात तालुकास्तरावर प्रथम (सन २००८-२००९) | |
| २. | संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानांतर्गत आबासाहेब खेडकर पुरस्कार पुणे जिल्हयामध्ये तृतिय (सन २००८-२००९) | फोटो पहा |
| ३. | संत गाडगेबाबा ग्रामस्वछता अभियान पुणे जिल्हयात तृतीय (सन २०१०-११) | |
| ४. | संत गाडगेबाबा अभियाना अंतर्गत साने गुरूजी आदर्श स्वच्छ शाळा म्हणुन प्रथम (सन २०१०-११) | फोटो पहा |
| ५. | पुणे जिल्हा परिषदेचा आदर्शशाळा म्हणुन जिल्हयात प्रथम (सन २०११-१२) | |

**वास्तू व मंदिरांचा इतिहास:-**

खरतर याच्याच साठी आपण वेबसाईट तयार केली आहे. आपल्याही गावात काही ऐतिहासिक वास्तू असतील त्याची फोटोसहीत थोडक्यात इतिहास द्यावा. माहितीमध्ये वास्तुचे /मंदिराचे नाव : स्थापना / मंदीर रचना / थोडक्यात इतिहास/ वास्तूचा फोटो : अशी वर्गवारी करावी त्याचे उदाहरण पहा .

**मंदिराचे नाव :विठ्ठल मंदीर**



पिंपळगावचे आराध्य दैवत म्हणुन पावन झालेल्या श्रीराम नगरीमध्येच विठ्ठलाचेही मंदीर आहे. पुर्वी ही दोन्ही मंदीरे वेगळी होती विठ्ठल मंदीर हे पुरातन कालीन मंदीर आहे. हे मंदीर हेमाडपंथीय लोकांनी बांधले असुन पेशवेकालीन वारसा लाभलेले हे मंदीर आहे. विठ्ठलाचा गाभारा मजबुत अशा दगडी चिरांमध्ये बांधला गेला आहे. या मंदीरात संत ज्ञानेश्वर, विठ्ठल रखुमाई व संत तुकारामांची मुर्ती आहेत. दरवर्षी महिनाभर काकडयाचे आयोजन केले जाते.

**गावातील शैक्षणिक माहिती :-**

जसा गावाला ऐतिहासिक वारसा असतो त्याप्रमाणे शैक्षणिक वारसाही असतो याबाबतचीही . माहिती आपण वेबसाईटवर टाकणार आहोतयामध्ये अंगणवाडी ., प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, आदींची माहिती समाविष्ट असणार आहेमाहितीमध्ये . शाळेचे नाव, शाळेची स्थापना, शाळेचे वर्णन, शाळेतील कर्मचारी संख्या, शाळेतील सरासरी विद्यार्थी

संख्या, शाळेमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा व शाळेला मिळालेले पुरस्कार यांची फोटोसहीत माहिती असणार आहे. उदाहरणासाठी खालील माहिती पहा.

**प्राथमिक शाळा (प्रातिनिधिक स्वरुपात एक शाळा दिली आहे.)**

**शाळेचे नाव** :जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव ख.



**शाळेची स्थापना** :१९९४

**शाळेचे वर्णन :**

१ ली ते ४ थी पर्यंतची शाळा
शाळेला एकुण १२ खोल्या आहेत.
ग्रामस्थांनी लोकवर्गणीतुन बांधुन दिलेले शिवछत्रपती सभागृह परिपाठ व लहान मोठया कार्यक्रमासाठी वापरले जाते.
शाळेला भव्य असे प्रवेशद्वार असुन दुतर्फा वृक्षांची लागवड केली आहे.
शाळेसमोर प्रशस्त मैदान असुन मुला मुलींसाठी स्वंतत्र शौचालये आहेत.

**शाळेतील सरासरी शिक्षक संख्या** :९

**शाळेतील सरासरी विद्यार्थी संख्या** :२९२=मुले १४९ +मुली १४३

**शाळेमार्फत देण्यात येणारी सुविधा :**

विद्यार्थ्यांना सर्व विषयाचे अध्यापन
प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती परिक्षेची तयारी
परिसर भेट सहली
पिण्यासाठी स्वच्छ पाणी
संगणक कक्ष संगणकाचे शिक्षण स्वंतत्र शिक्षिका
शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत दर्जेदार भात
इ-लर्निंग सॉफ्टवेअर सुविधेद्वारे विद्यार्थ्यांसाठी शिक्षण
पालक मेळावा आयोजन पालकांचे प्रबोधन
तज्ञ व नामांकित मान्यवरांचे मार्गदर्शन
प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार
शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना सायकल

**शाळेला मिळालेले पुरस्कार :**

१. साने गुरूजी स्वच्छ शाळा सुंदर शाळा रू.५०००० जिल्हयात प्रथम
२. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तालुकास्तर प्रथम क्रमांक रू. १०००० रोख बक्षीस
३. शिष्यवृत्ती प्रज्ञाशोध मार्गदर्शक शिक्षकांना ग्रामस्थांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार
४. पंचायत समिती आंबेगाव व पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षक गुणवंत पुरस्कार

**गावातील फोटो संग्रह:-**

यात तुम्ही दिलेले महत्वाचे फोटो असतील ते फोटो खालीलप्रमाणे:-

१) गावातील मंदिराचे फोटो.
२) गावातील वास्तूचे फोटो.
३) गावातील शाळांचे फोटो.
४) गावातील सार्वजनिक जागांचे फोटो. उदा. ग्रामपंचायत,वाचनालय, रस्ते, पाण्याची टाकी, स्मशानभूमी, दफनभूमी, गावची वेस, नदीचा पूल, गावची बाग, सभागृह, गावची चावडी, दुग्धालय,
५) विकासकामांचे फोटो.

**इतर महत्वाच्या बाबी ज्या वेबसाईट मध्ये मिळणार आहे.**

७) **गावाचा सॅटेलाईट नकाशा** :- यामध्ये उपगृहावरून आपले गाव जसेच्या तसे दिसणार आहे. त्यामध्ये असणाऱ्या सार्वजनिक जागांची माहिती फोटोसहित नमूद केली जाणार आहे. शिवाय या नकाश्यामध्ये कशी माहिती भरायची याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. जेणेकरून गावामध्ये राहणाऱ्या व्यक्तींची माहिती फोटोसहीत देणे सोयीस्कर होईल. यात सार्वजनिक वस्तूंची नोंद करण्यासाठी गावाबाबत उत्तम माहिती असणाऱ्या एखाद्या ग्रामस्थाने आम्हाला त्यांचा बहुमूल्य वेळ द्यावा म्हणजे नकाशा तयार करता येईल.(जर आपण गुगल किंवा विकीमेपिया यापैकी काही जरी वापरीत असाल तर कृपया काही महत्वाच्या ठिकाणांची जागा कोठे आहे हे निश्चित करा. )

८) **गावाचे बातमीपत्र** :- गावामध्ये विविध चालू घडामोडी घडत असतात. त्या घडामोडींची नोंद करण्यासाठी आपण गावाचे बातमीपत्र तयार केले आहे ज्यात आपण वर्षभरात होणाऱ्या ग्रामसभा, उत्सव, उपक्रम, मान्यवरांनी दिलेल्या भेटी यांची नोंद करू शकता. हे बातमीपत्र अपडेट करणे अतिशय सोप्पे आहे. आपल्या गावामधील कोणताही संगणक शिक्षित हे काम करू शकतो. त्याचेही प्रशिक्षण आपणास दिले जाईल.

९) **वेबसाईट स्पॉन्सर**:- वर नमूद केल्याप्रमाणे <u>कोणतेही काम कुणा एकाच्या निग्रहाने कधीच पूर्णत्वास जाऊ शकत नाही त्यासाठी हवी असते अनेकांच्या मदतीची साथ. मदत करणाऱ्याचे ऋण व्यक्त करणेही तितकेच महत्वाचे असते.</u>आपण या वेबसाईटमध्ये वेबसाईट स्पॉन्सर नावाचा विभाग तयार केला आहे. यात ज्या मान्यवरांनी वेबसाईटसाठी देणगी स्वरुपात मदत केली आहे. त्याचे फोटो समाविष्ट केले आहे. शिवाय वेबसाईट पाहत असताना प्रत्येक पानावर त्यांचा उल्लेख केला आहे.

**१०) जाहिरातीचे पान**:- वेबसाईट हे आज इंटरनेटच्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचणारे जबरदस्त माध्यम आहे. गावाच्या वेबसाईटमधून गावातील ग्रामस्थांच्या करत असलेल्या व्यवसायाची जाहिरात आपण इंटरनेटवर करू शकतो. यासाठी गावातील त्या संबधित व्यक्तीच्या व्यवसायाचे कार्ड देणे गरजेचे आहे.

**११ ) व्हिडीओ गॅलरी:-** यामध्ये आपण गावाची एक व्हिडीओ डॉक्युमेंटरी तयार करणार आहोत. ज्यात चित्रफितीच्या स्वरुपात गावातील वास्तू, मंदिरे, सार्वजनिक इमारती,गावातील रस्ते, वेस, गटारे आदींची माहिती देणार आहोत जेणेकरून अधिक रंजक पद्धतीने गावाबाबत माहिती देता येईल.

**पण वेबसाईटच कशाला? (हे प्रश्न पडणे साहाजिक आहे.)**

१) वर दिलेल्या माहितीचे फोटोसहीत जर पुस्तक रुपी प्रकाशन केले तर कमीत कमी १०० पाने तयार होतील. एक १०० पानी पुस्तक छपाई खर्च ५०/- रुपये आला. त्याच्या नुसत्या १००० प्रति काढल्या तर तब्बल५०,००० /- रुपये खर्च होतो. हे पुस्तक गावापुरतेच मर्यादित राहील संपूर्ण महाराष्ट्राला वाचायला देण्यासाठी करोडो रुपये खर्च होतील. शिवाय एकदा छापले कि पुन्हा बदल करणे अवघड होते. त्यामुळे ही पद्धत खर्चिक ठरते.

२) याला पर्याय म्हणून वेबसाईट बनविणे सोयीस्कर ठरते. कसे तर खालीलप्रमाणे :-
अ)पुस्तक छपाई च्या तुलनेत अतिशय कमी खर्च
आ)कधीही माहिती बदलता येते.
इ)रंगीत फोटो व ॲनिमेशन मुळे आकर्षकता वाढते.
ई)महाराष्ट्रातील नव्हे-नव्हे तर जगातील कुठल्याही कानाकोपऱ्यातून माहिती मिळविणे सोयीचे होते.असंख्य लोक एकाचवेळी इंटरनेटवर महिती पाहू शकतात.
उ)गावाच्या माहितीबरोबरच इतर व्यवसायाची जाहिरातही होऊन जाते.
ऊ)सॅटेलाईट नकाशामुळे गाव आणखीन जवळून पाहता येते.
ए)फेसबुक,ई-मेल आयडी, बातमीपत्रामुळे संपर्क प्रस्थापित होतो.

ऐ)माहिती जतन स्वरुपात राहते.
ओ)गावाचे असे ऑनलाइन काम पाहिल्यानंतर शासनाकडून गावातील विकासकामांना लाखो रुपयाचा निधी मिळू शकतो.
औ) शिवाय गावाला वेबसाईटच्या माध्यमातून तसेही एक लाख रुपयापर्यंत मदत होणारच आहे.

**आमच्याशी संपर्क साधण्यासाठी कॉल करा. :-**

**९८६०४१०४९६(वैभव पोखरकर)**

**महत्वाचे**

**संबधित माहिती आपल्याला मराठी मध्ये द्यावयाची असल्याकारणाने आपणाला युनिकोड या भाषेबाबत माहिती असणे आवश्यक आहे.**







**अश्याप्रकारे युनिकोड मध्ये हा डेटा उपलब्ध करून दिला तर झटपट काम होईल किंवा कागदी स्वरूपात माहिती, व फोटो कुरियर ने पाठवून द्या. किंवा ई-मेल द्वारे पाठवा.**

**धन्यवाद !!!**